Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18849366

# भारतीय संघराज्य व्यवस्था आणि केंद्र-राज्य आर्थिक संबंध

प्रो. डॉ. शिवाजी दिवाण[1] & शिंदे व्ही. एम.[2]

**प्रस्तावना-**

भारतीय राज्यघटनेचा स्वीकार केलेल्या ऐतिहासिक घटनेला आता ७७ वर्षे उलटून गेली आहेत. घटनाकारांच्या हेतुनुसार राज्यघटनेने तिचे काम चोख बजावले आहे. एखादी कितीही आदर्श राज्यघटना तयार केली, तरी ती तिची व्यवस्था कागदावरच प्रस्थापित करू शकते. तिच्या संस्थात्मक रचनेमध्ये जीव ओतून तिला जिवंत करून चालवण्याचे काम हे पुढच्या पिढ्यांनीच करायचे असते. भारतामध्ये घटनेने घालून दिलेली संसदीय व्यवस्था ही तिच्या सशक्त वाढीसाठी पुरेशी प्रेरणादायी आहे. घटनेने प्रस्थापित केलेल्या राजकीय संस्था भारतीयांनी मान्य केल्या आहेत आणि चालवून दाखवल्या आहेत. काही अपवाद,जहालवादी लोकांचे हल्ले आणि राज्यांमध्ये वेळोवेळी राज्यपालांच्या माध्यमातून कोसळलेली सरकारे,इ. ही संकटे पचवून, घटनेच्या मार्गदर्शनानुसार भारत सरकार चालले आहे. प्रा. मोरिस जोन्स यांनी म्हटल्याप्रमाणे, भारतीय राजकारणाची 'भाषा' घटनेने आत्मसात केली आहे.

भारतात संघराज्य प्रणाली असल्यामुळे येथील वित्तीय व्यवस्था देखील संघराज्यात्मक पद्धतीची आहे. केंद्र व राज्य यांच्या उत्पन्नाच्या बाबी वेगवेगळ्या असून संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील केंद्रसूची व राज्यसूचीमध्ये त्यांचा उल्लेख आहे. संविधानकारांनी सन १९३५ च्या भारतविषयक कायद्याचा संदर्भ घेऊन केंद्र व राज्य यांच्या दरम्यानचे वित्तीय संबंध निश्चित केले आहेत.

**संशोधन लेखाचे उद्दिष्टे :-**

1. संघराज्य ही संकल्पना समजून घेणे.
2. संघराज्य आणि केंद्र-राज्य संबंध यांचा अभ्यास करणे.
3. केंद्र-राज्य आर्थिक संबंध व भारतीय राज्यघटनेतील तरतुदी समजून घेणे.

[1] प्राध्यापक, राज्यशास्त्र, महिला महाविद्यालय, गेवराई ता. गेवराई जि. बीड
[2] संशोधक विद्यार्थी

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत संशोधन लेखासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पद्धती चा अवलंब करून केंद्र-राज्य संबंध व संघराज्यवादाचा अभ्यास करण्यासाठी व तथ्य संकलनासाठी संदर्भ ग्रंथ, पुस्तके, वर्तमानपत्रे, इंटरनेट इ. दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

**केंद्र-राज्य आर्थिक संबंध-**

केंद्र व राज्य सरकारचे कर विषयक अधिकार

(१) केंद्र सूचीत केंद्र शासनाच्या उत्पन्नाच्या बाबी नमूद करण्यात आलेल्या असून त्यासंबंधी कर आकारण्याचा अधिकार केंद्र शासनास आहे. केंद्राच्या उत्पन्नाच्या बाबी महामंडळ कर, केंद्रीय उत्पादन शुल्क, सीमा शुल्क, वृत्तपत्रांच्या खरेदी-विक्रीवरील कर, जाहिरातींवरील कर, शेती उत्पन्नाशिवाय इतर उत्पन्नावरील कर, संपत्ती कर, रेल्वे, समुद्र किंवा विमान मार्गाने जाणाऱ्या उतारूवरील सीमांत कर इत्यादी.

(२) राज्यसूचीत राज्य शासनाच्या उत्पन्नाच्या बाबी नमूद करण्यात आलेल्या असून त्यासंबंधी कर आकारण्याचा अधिकार राज्य शासनास आहे. राज्यांच्या उत्पन्नाच्या बाबी:शेतीच्या उत्पन्नावरील कर, शेतसारा, व्यवसाय कर, व्यापार कर, करमणूक कर, यात्रा कर, वाहन कर, मादक पेयांवरील अबकारी कर, विजेच्या वापरावरील कर, जमीन महसूल इत्यादी.

(३) समवर्ती सूचीत समाविष्ट असणाऱ्या यंत्रचलित वाहने, न्यायिक मुद्रांकाद्वारे वसूल केलेली शुल्के किंवा फी यांहून अन्य मुद्रांक शुल्के (पण यामध्ये मुद्रांक शुल्क दरांचा समावेश नाही) आणि समवर्ती सूचीत असलेल्या कोणत्याही बाबी संबंधातील फी (पण यात न्यायालयीन फीचा समावेश नाही) या बाबीसंबंधी केंद्र शासनास व राज्यशासनास कर आकारण्याचा अधिकार आहे.

(४) कर आकारणी बाबतचे शेषाधिकार संसदेकडे म्हणजेच पर्यायाने केंद्र शासनाकडे आहेत. याचा अर्थ, राज्यसूचीत व समवर्तीसूचीत स्पष्टपणे उल्लेखित नसलेल्या बाबींवर कर आकारण्याचा अधिकार केंद्र शासनास आहे.

(५) महामंडळ कर, सीमाशुल्क, व्यक्ती व कंपन्यांच्या शेतीउत्पन्न वगळता इतर उत्पन्नावर आकारण्यात येणाऱ्या करावरील अधिभार आणि केंद्र शासनाद्वारे आकारण्यात येणारे, केंद्र शासनाद्वारेच वसूल केले जाणारे; परंतु ज्यांचे उत्पन्न संपूर्णतः राज्यशासनांना दिले जाते अशा करांवरील अधिभार, हे कर केंद्र शासनाद्वारे आकारण्यात येतात व वसूल केले जातात. या करांद्वारे प्राप्त होणारे उत्पन्न संपूर्णतः केंद्र शासनालाच मिळते.

Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18849366

(६) आकारणी, वसूली व विनियोजनाच्या दृष्टीने संपूर्णतः केंद्राच्याच अखत्यारीत असणारे कर वगळता, अन्य केंद्रीय कराचे उत्पन्न एकतर राज्यांना दिले जाते किंवा केंद्र व राज्य यांच्या दरम्यान त्यांची वाटणी केली जाते.

केंद्र-राज्य आर्थिक संबंध गुंतागुंतीचे असून केंद्रशासनाच्या अधिकारक्षेत्रातील उत्पन्नाच्या बाबींपासून मिळणाऱ्या उत्पन्नाची केंद्र व घटकराज्ये यांच्यात विभागणी करण्यासंबंधी पुढील तरतुदी आहेत-

| **अनुच्छेद** | **आकारणी** | **वसुली** | **उत्पन्न** | **उदाहरण** |
|---|---|---|---|---|
| २६८ | केंद्र | राज्य | राज्य | औषधे व सौंदर्यप्रसाधने यांच्यावरील उत्पादन शुल्क व मुद्रांक शुल्क |
| २६९ | केंद्र | केंद्र | राज्य | शेतीशिवाय इतर मिळकती वरील संपत्ती कर, वारसाहक्कांबाबत कर, वृत्तपत्राच्या खरेदी विक्रीव त्यावरील जाहिराती वरील कर इत्यादी. |
| २७० | केंद्र | केंद्र | केंद्र व राज्य | शेतीचे उत्पन्न वगळता इतर उत्पन्ना वरील कर. |

याशिवाय कलम २७३ नुसार ताग व तागापासून निर्मित वस्तू यांवरील निर्यात कर केंद्र शासनाकडून लावला जातो व वसूल केला जातो. मात्र केंद्र सरकार त्या उत्पन्नाच्या बदल्यात पश्चिम बंगाल, आसाम, बिहार व ओडिशा या राज्यांना अनुदान म्हणून काही रक्कम देते.

**महसुलाचे वितरण-**

राज्यघटनेच्या इतर सगळ्या पैलूंमध्ये भारतीय संघराज्यपद्धतीचे व्यवच्छेदक लक्षण दिसून येते आणि केंद्र व राज्ये यांच्या कार्यक्रमातली सुसंगतीही दिसते. पण महसूलविषयक तरतुदींच्या बाबतीत मात्र उत्कृष्ट संघराज्यपरंपरेला थेटपणे कोणी भिडू शकत नाही. उत्कृष्ट संघराज्यघटनेच्या अंतर्गत केंद्र आणि प्रादेशिक या दोन्ही सरकारांमधील प्रत्येकाचा स्वतंत्र आर्थिक स्रोत असायला हवा, ज्याच्यावर त्याचे नियंत्रण असायला हवे जेणेकरून ते सरकार त्याची कामे उत्तमरीतीने करू शकेल, असे डॉ. व्हेअरे यांनी लिहिले आहे.' प्रांतीय प्रतिनिधींनी जेव्हा प्रांतांसाठी जास्त महसुलाची मागणी केली, तेव्हा ती काही 'प्रांतीय स्वायत्तता' प्रस्थापित करण्यासाठी नाही तर स्वाभिमानासाठी व आपल्या प्रांताच्या सामाजिक जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे पार पाडण्याची क्षमता मिळवण्यासाठी. या विषयाच्या तरतुदी करण्यामागचा आणि आर्थिक तरतुदी करण्यामागचा घटनासमितीचा दृष्टिकोन आणि तरतुदी बघितल्या तर बर्चच्या सहकारी संघराज्यपद्धतीचे वर्णन किती खरे आहे हे कळते.

**कर्ज उभारणी-**

अनुच्छेद २९२ अनुसार संसदेने निश्चित केलेल्या मर्यादेमध्ये केंद्र शासनास आपल्या एकत्रित निधीच्या आधारावर भारतात व भारताबाहेर कर्ज उभारणी करता येते.

अनुच्छेद २९३ अनुसार,

(१) राज्य विधिमंडळाने निश्चित केलेल्या मर्यादेमध्ये राज्यशासनास आपल्या एकत्रित निधीच्या आधारावर भारतात कर्ज उभारणी करता येते.

(२) संसदेच्या कायद्यातील अटींच्या अधीन राहून केंद्र शासन कोणत्याही राज्याला कर्जे देऊ शकते अथवा राज्याने उभारलेल्या कर्जासंबंधी हमी देऊ शकते. या स्वरूपाची हमी अथवा कर्जे भारताच्या एकत्रित निधीवर प्रभारित केली जातात.

(३) राज्याने केंद्र शासनाकडून घेतलेले कर्ज किंवा केंद्र शासनाच्या हमीच्या आधारावर घेतलेले कर्ज यांची संपूर्ण परतफेड केलेली नसेल तर, त्या राज्याला केंद्र शासनाच्या संमतीशिवाय नवी कर्ज उभारणी करता येत नाही. अशा प्रसंगी केंद्रशासनास आवश्यक वाटल्यास काही शर्तींच्या आधारावर अशी संमती देण्याचा अधिकार आहे.

**वित्त आयोगाबाबत तरतुदी -**

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २८० मध्ये वित्त आयोगाच्या स्थापनेची तरतूद आहे. संविधानातील तरतुदीनुसार राष्ट्रपती दर पाच वर्षांनी किंवा त्यास आवश्यक वाटेल तेव्हा वित्त आयोगाची स्थापना करू शकतो. वित्त आयोगात एक अध्यक्ष व चार अन्य सदस्य असतात. आयोगाच्या सदस्यांच्या निवडीची पद्धत व पात्रता निर्धारित करण्याचा अधिकार संसदेस आहे.

खालील बाबीसंबंधी शिफारशी करणे हे आयोगाचे कर्तव्य असते-

(१) केंद्र व राज्य यांच्या दरम्यान वाटपयोग्य असणाऱ्या करांचे निव्वळ उत्पन्न त्यांच्यामध्ये वितरित करण्यासंबंधी आणि विविध घटकराज्यांचे त्यातील वाटे निश्चित करण्यासंबंधी शिफारस.

(२) भारताच्या एकत्रित निधीतून राज्यांना देण्यात येणाऱ्या सहायक अनुदानाच्या तत्त्वांसंबंधी शिफारस. (३) राज्य वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील पंचायतीच्या उत्पन्न साधनात भर घालण्यासाठी राज्याच्या एकत्रित निधीत वाढ करण्याविषयी उपाय सुचविण्यासंबंधी शिफारस.

(४) राज्य वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार नगरपालिकांच्या उत्पन्न साधनात भर घालण्यासाठी राज्याच्याएकत्रित निधीत वाढ करण्याविषयी शिफारसी.

(५) वित्त व्यवस्था बळकट राहावी यासाठी आयोगाकडे निर्देशित केलेली अन्य कोणतीही बाब.

आयोगास आपली कार्यपद्धती ठरविण्याचा अधिकार असून संसदेद्वारे त्यास आपली कर्तव्ये पार पाडण्यासंबंधीचे अधिकार प्रदान केले जातात.

**इतर तरतुदी-**

**(१) आर्थिक आणीबाणी :** संविधानाच्या अनुच्छेद ३६० अनुसार, घोषित केलेल्या आर्थिक आणीबाणीच्या काळात आर्थिक बाबी संबंधीचे सर्वाधिकार केंद्रशासनास प्राप्त होतात.

**(२) मध्यवर्ती बँक :** भारतीय रिझर्व्ह बँक ही भारताची मध्यवर्ती बँक असून ती केंद्र शासनाच्या नियंत्रणाखाली असते. साहजिकच, या बँकेची ध्येय धोरणे केंद्रास अनुकूल अशीच असतात.

**निष्कर्ष-**

भारतीय राज्यघटनेची रचना असाधारण आहे, त्याचे वर्णन थोडक्यात करणे अशक्य आहे. 'संघराज्यसदृश' किंवा 'वैधानिक विकेंद्रीकरण' अशा प्रकारची संघराज्य पध्दती आपल्या भारतात अस्तित्वात आहे. घटनासमिती सदस्यांना संघराज्य पद्धतीच्या कुठल्याही एका तत्त्वप्रणालीला किंवा मतप्रणालीला चिकटून राहायचे नव्हते. त्यांचा विश्वास होता, की भारताचे प्रश्न हे एकमेवाद्वितीय असे आहेत व अशा प्रश्नांना सामोरे जाण्याची वेळ जगातल्या दुसऱ्या कोणत्याही संघराज्यावर आलेली नाही. त्यामुळे भारताचे प्रश्न सोडवण्यासाठी संघराज्यपद्धतीच्या कुठल्याही तत्त्वप्रणालीला चिकटून राहणे योग्य नाही. जगातल्या युनायटेड स्टेट्स, कॅनडा, स्वित्झर्लंड, आणि ऑस्ट्रेलिया अशा मोठ्या संघराज्यांच्या उदाहरणांवरून, घटनासमितीच्या सदस्यांनी योग्य आणि भारतीयांसाठी हितकारक हे धोरण अवलंबले; ते हे पाहण्यासाठी की आपल्यासाठी सुयोग्य, आपल्या बुद्धीला पटणारे

आणि देशासाठी उत्तम असे काय आहे. या प्रक्रियेतून संघराज्य सरकारची रचना व त्याचे त्याच्या घटकराज्यांशी असलेले संबंध याविषयीच्या प्रस्थापित कल्पनांमध्ये नवीन सुधारणा जन्माला आल्या. भारताच्या वैशिष्ट्यपूर्ण गरजा भागवण्यासाठी घटनासमितीने एका नवीन प्रकारच्या संघराज्यपद्धतीची निर्मिती केली.

उपरोक्त बार्बीवरून पुढील निष्कर्ष निघतात-

(अ) केंद्राचे आर्थिक स्रोत घटकराज्यांच्या तुलनेत अधिक लवचिक व अधिक उत्पन्न देणारे आहेत.

(ब) आर्थिक संसाधनांच्या बाबतीत घटकराज्ये केंद्रावरच अवलंबून आहेत.

(क) कर महसुलाचे वाटप व अनुदानांची निश्चिती वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार होत असली तरी वित्त आयोगाची स्थापना राष्ट्रपतीकडून केली जाते; पर्यायाने त्यावर केंद्रशासनाचाच प्रभाव असतो.

केंद्र आणि राज्यांमधील आर्थिक संबंध हा बराच काळ वादग्रस्त मुद्दा राहिला आहे, विशेषतः २०१७ मध्ये जीएसटी लागू झाल्यानंतर. जीएसटी करप्रणाली सुलभ करण्यासाठी होता, परंतु त्यामुळे अप्रत्यक्ष करांवरील राज्यांची स्वायत्तता देखील कमी झाली आहे, ज्यामुळे ते केंद्राच्या हस्तांतरणावर अधिक अवलंबून राहिले आहेत. सद्यस्थितीत केंद्र-राज्य संबंध तणावाचे होण्यात हा घटक अत्यंत कळीचा मुद्दा ठरला आहे.

**असमान संसाधन वाटप:** श्रीमंत राज्ये (जसे की महाराष्ट्र, तामिळनाडू, कर्नाटक) कर महसुलात जास्त योगदान देतात परंतु त्यांना वाटते की त्यांना कमी परतावा मिळतो, तर गरीब राज्ये केंद्रीय मदतीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतात.

**अधिभार आणि उपकर समस्या:** केंद्र राज्यांसोबत सामायिक न केलेले अधिभार आणि उपकर (इंधन, शिक्षण, आरोग्य इत्यादींवर) आकारते, ज्यामुळे त्यांचे आर्थिक स्वातंत्र्य कमी होते. उदा: २०२० मध्ये, अनेक राज्यांनी (पंजाब, केरळ, पश्चिम बंगाल) कोविड-१९ मुळे महसूलात घट झाल्याचे कारण देत जीएसटी भरपाई वाढवण्याची मागणी केली. तथापि, केंद्राने त्यांना त्याऐवजी कर्ज घेण्यास सांगितले, ज्यामुळे निदर्शने झाली.

**जीएसटी भरपाईमध्ये विलंब:** केंद्राने जीएसटीनंतर पाच वर्षांसाठी (२०१७-२२) राज्यांना महसूल नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन दिले होते. तथापि, देयकांमध्ये विलंब झाल्यामुळे संघर्ष निर्माण झाला आहे.यावरून हे सिद्ध होते की, आर्थिक अधिकारांच्या बाबतीत देखील केंद्र शासनच प्रबळ ठरते. केंद्राची आर्थिक सबलता राष्ट्रीयहिताच्या दृष्टीने उपकारक ठरते. कारण,

घटकराज्ये आर्थिक बाबतीत केंद्रावर अवलंबून असल्यामुळे केंद्राची अवमानना करू शकत नाहीत. त्यामुळे, संघराज्य व्यवस्था सुदृढ राखण्यासाठी ही बाब उपयुक्त ठरते. असे काही अभ्यासकांचे मत आहे.

**संदर्भ-**

१) (अनुवाद: भारती केळकर) ग्रँनव्हिल आस्टिन, भारतीय राज्यघटना राष्ट्राची कोनशिला, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.२०१३

२) डॉ. वि.मा.बाचल व प्रा.र.घ.वराडकर, राज्यशास्त्र, निराली प्रकाशन, पुणे. २०१०

३) घायाळ विनायक, भारतीय राज्यघटना आणि राजकीय व्यवहार, के'सागर पब्लिकेशन्स,पुणे.२०१४

४) डॉ. वि. का. गर्दे, प्रा. नसीम इकबाल, राज्यशास्त्र विचार, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे. १९७३

५) डॉ. दि. का. गर्दे, डॉ. वि. मा. बाचलआधुनिक राजकीय विश्लेषण,कॉंटिनेंटल प्रकाशन,१९७६

६). दै. महाराष्ट्र टाइम्स (३०आक्टो.२०१५) व दै. लोकसत्ता.(८ ऑक्टो.२०२४)

७). www.google.com

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*